३३/५

ग्रामस्तरावरील "ग्राम आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समिती" मध्ये पर्यावरण हा विषय आणून समितीचे नाव **"ग्राम आरोग्य, पोषण, पर्यावरण व पाणी पुरवठा व स्वच्छता समिती"** असे करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
**शासन निर्णय, क्र. ग्रापाधो-११०९/ प्र.क्र. १०५/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक: ३१ ऑक्टोबर, २००९.**

संदर्भ :- शासन निर्णय, क्रमांक ग्रापापु-१००६/प्र.क्र. ३६९/ पापु-०७, दि.६ डिसेंबर, २००६

**शासन निर्णय :-**

संदर्भाधीन शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या ग्राम आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या अख्यत्यारित पर्यावरण हा विषय आणण्यात येत असून समितीचे नामनिधान ग्राम आरोग्य, पोषण, पर्यावरण, पाणी पुरवठा व स्वच्छता समिती असे करण्यात येत आहे.

या समितीच्या कार्यकक्षा, कर्तव्य व जबाबदा-या यामध्ये पर्यावरण विषयक पुढील बाबींचा समावेश करण्यात येत आहे.

**पर्यावरण विषयक बाबी**

१) गावातील सर्व पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे संवर्धन करणे .
२) स्थानिक परिस्थितीस अनुकुल वृक्षांचे रोपण व संवर्धन करणे
३) सांडपाण्याचे यथायोग्य व्यवस्थापन करणे
४) स्थानिक परिस्थितीनुरूप पर्यावरण संवर्धन कार्यक्रम हाती घेणे.
५) घनकचराचे व्यवस्थापन व पुनर्चक्रन करणे.
६) प्लॅस्टिक मुक्त गाव, एक घर एक झाड, परिसर स्वच्छता, वनराई विकास / गावरान.
७) सांडपाण्यावर प्रक्रिया व त्याचा योग्य तेथे पुनर्वापर.
८) आवाज प्रदुषणाचे व फटाकांचे आरोग्यावर होणारे परिणाम.
९) जनसहभागातून पर्यावरण संवर्धनासाठी लघु प्रकल्प, अपारंपारिक ऊर्जेचा वापर, Sustainable विकासाच्या दृष्टिने प्रकल्प /उपाययोजना
१०) प्रदुषण व आरोग्यावरील परिणाम
११) पर्यावरण जनजागृती सभा /मंच इत्यादी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००९०७०९१२४७५३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अजितकुमार जैन

**(अजितकुमार जैन)**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत :
*मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव*
*मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव*

G:\CR 105 09 addendum.doc

मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव
मा. मंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)
मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)
मा. सदस्य, महाराष्ट्र विधानसभा / परिषद (सर्व)
अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व)
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (दोन प्रती)
सचिव, आरोग्य व कुटुंब कल्याण, मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली (पत्राने)
विभागीय आयुक्त (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, मुंबई
जिल्हाधिकारी (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,( सर्व)
प्रकल्प व्यवस्थापक, जलस्वराज्य प्रकल्प, सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, बेलापूर
प्रकल्प अधिकारी, आपलं पाणी प्रकल्प, सुधारण सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, बेलापूर
प्रकल्प व्यवस्थापक, स्वजलधारा, बेलापूर
अभियान संचालक, राज्य आरोग्य अभियान, मुंबई
अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद,( सर्व)
प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण( सर्व)
सह संचालक, आरोग्य सेवा (सर्व)
उप-संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
उप संचालक, आरोग्य सेवा, विभागीय मंडळे (सर्व)
अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
जिल्हा माहिती अधिकारी (सर्व)
जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व)
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ( सर्व)
कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद,(सर्व)
उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
तहसीलदार (सर्व)
गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र-२ नागपूर (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई
उप-मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक, पुणे, औरंगाबाद/ अमरावती व नागपूर
सरपंच, ग्रामपंचायत (सर्व)
सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
महिला व बालविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
मंत्रालयातील इतर सर्व विभाग
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवड नस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७